भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ११५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०२/२०१७

१) घराचा दाराचा कुलुप कोंडा तोडुन सामानाची चोरी . :–

दिनांक १५/०२/२०१७ चे १६.०० वा. पासुन ते १६/०२/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी रिचर्ड जोबार्ड डॅनीयल डिसुजा वय ४४ वर्ष, रा. बेला यांनी समोरील दाराचे कुलुप कोंडा तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण आत प्रवेश करुन क्राप्टर कंपनीचा डेक, १ जुना सोनी कंपनीचा कॅमेरा, १ एचपी कंपनीचा जुना स्कॅनर, १ चांदीचा चाबीचा झोका, असा एकुण १७,४००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

२) स्थागुशा भंडारा यांची कारवाई . :–

अ) दिनांक १६/०२/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान. यातील आरोपी क्र. १ ने ती किरायाने राहत असलेल्या घरी देह विक्री करण्याकरीता आरोपी क्र. २ हीला स्वत:चे आर्थीक फायदया करीता देह विक्री करण्यास प्रवृत्त करुन आरोपी क्र. १ व २ हे आर्थीक फायदया करीता देह विक्री करतांना तसेच आरोपी क्र. ३ हा शरीर संबंध प्रस्थापीत करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४,५(१)(क) अनैतीक व्यापार कायदा १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रिझवी पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

ब) दिनांक १६/०२/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान. यातील आरोपी क्र. १ ने आपले राहते घरी आरोपी क्र. २ ते ४ यांना देह विक्री करण्याकरीता स्वत:चे आर्थीक फायदया करीता देह विक्री करण्यास प्रवृत्त करुन व ती स्वत:चे आर्थीक फायदया करीता देह विक्री करतांना शारिरीक संबध प्रस्थापीत करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४,५(१)(क) अनैतीक व्यापार कायदा १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सोनटक्के पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १६/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१,तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

17.2

(एस. व्ही. कुलकर्णी)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.